**मे. जे.एस.डब्लु. एनर्जी पी.एस.पी. टु. ली. यांचा प्रस्तावित भावली पंप स्टोरेज व जल विद्युत (५ x २५० +२ x १२५ मेगावॅट ) प्रकल्प मु. जामुंडे पो. मनवेडे ता. इगतपुरी, जि नाशिक येथे उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्त :**

........................................................................................................................

मे. जे.एस.डब्लु. एनर्जी पी.एस.पी. टु. ली. यांचा प्रस्तावित भावली पंप स्टोरेज व जल विद्युत (५ x २५० +२ x १२५ मेगावॅट ) प्रकल्प मु. जामुंडे पो. मनवेडे ता. इगतपुरी, जि नाशिक येथे उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. उप-विभागिय अधिकारी, ता. इगतपुरी, जि. नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. १० जानेवरी २०२४ रोजी दुपारी १२-३० वाजता पार पडली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं. ई - ५० / २०२३ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २३०७१८ – एफटीएस– ०२४ दि. १८/०७/२०२३ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१) उप विभागिय दंडाधिकारी, इगतपुरी/त्र्यंबकेश्वर उपविभाग, मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे प्रतिनिधी - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक (सदस्य सचिव म.प्र.नि.मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी) - सदस्य

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - संयोजक

श्री. अमर दुर्गुळे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नाशिक तथा संयोजक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत केले. मा. जिल्हाधिकारी तथा आजच्या जनसुनावणीचे अध्यक्ष यांनी त्यांचे प्रतिनिधी म्हणून विभागिय दंडाधिकारी इगतपुरी यांना अध्यक्ष पद भुषवण्यास सांगितले. आयोजकांनी आजच्या पर्यावरण समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली. संयोजक यांनी सदर पर्यावरण विषयक सुनावणी बाबतचे महत्व तसेच याबाबत केलेल्या कार्यप्रणालीची माहिती दिली.

संयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यापुर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. श्री. अमर दुर्गुळे, संयोजक यांनी असे सांगितले की म.प्र.नि. मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे. जे.एस.डब्लु. एनर्जी पी.एस.पी. टु. ली. यांचा प्रस्तावित भावली पंप स्टोरेज व जल विद्युत (५ x २५० +२ x १२५ मेगावॅट ) प्रकल्प मु. जामुंडे पो. मनवेडे ता. इगतपुरी, जि नाशिक प्रकल्प उभारणीबाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीसाठी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला. सदर अर्जाच्या अनुशंगाने मा. जिल्हाधिकारी नाशिक यांनी सदरची सुनावणी दि.१०.०१.२०२४ रोजी दु. १२.३० वाजता मा. उप-विभागिय अधिकारी, ता. इगतपुरी, जि. नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्याबाबत निर्देशित केले.

त्याअनुशंगाने सदर वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ नाशिक यांनी स्थानिक वृतपत्र मराठी दैनिक सकाळ व दैनिक टाइम्स ऑफ इंडीया या इंग्रजी यात दिनांक ०७.१२.२०२३ रोजी जनसुनावणीबाबत जाहीर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पा विषयी काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत शासनाच्या अधिसूचित कार्यालयांमध्ये म्हणजे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ – नाशिक, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई, मा. जिल्हाधिकारी कार्यालय- नाशिक, मुख्य कार्यकारी अधिकारी - जिल्हा परिषद, नाशिक, उप विभागीय अधिकारी, इगतपुरी, जिल्हा-नाशिक, तहसील कार्यालय, इगतपुरी, ग्रामपंचायत कार्यालय- जामुंडे, मनवेडे, धामुडकीवाडी, भावली खुर्द, काळभोंडे, कुरुंगवाडी, फंगुल गव्हाण, बोर्ली ता. इगतपुरी, जि. नाशिक व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर सामान्य जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेले होते.

उप-प्रादेशिक अधिकारी तथा संयोजक, यांनी सांगितले की, उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात. सदरहू सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी पर्यावरण व वातावरणीय मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

मा. अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी सदर सुनावणी सुरु करणेस परवानगी दिली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार मे. जे.एस.डब्लु. एनर्जी पी.एस.पी. टु. ली. यांचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबद्दल विविध मुदयांवर जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदय:स्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी बाबत सादरीकरण केले.

मा. अध्यक्ष यांनी सदर प्रकल्पाचे सादरीकरण हे स्थानिक लोकांना समजेल अशाप्रकारे करावे ज्यामध्ये प्रकल्पामध्ये धरण कोणत्या ठिकाणी येणार आहे ते कसे उभारले जाईल, तसेच खाजगी व वन जमीन कोठे असणार आहे, धरणाची भिंत जामुंडे येथे कोठे येणार, वीज निर्मिती कोठे होणार, पाण्याचा साठा कोठे असणार आहे इत्यादी बाबत माहिती द्यावी असे प्रकल्प प्रवर्तकास सांगितले.

लहु जाधव, प्रकल्प प्रवर्तक यांचे प्रतिनिधी यांनी ठाणे जिल्ह्यातील शहापूर या तालुक्यातील काळभोंडे व कोथळे या गावामध्ये पावसाचे पाणी साठविले जाईल. हे पाणी बंदीस्त पाईप द्वारे जामुंडे येथील प्रस्तावीत डॅम मध्ये घेतले जाईल. जामुंडे येथे दोन डोंगरांच्या मध्ये भिंत बांधून पाण्याचा साठा केला जाईल व हा साठा नैसर्गिक प्रवाहाद्वारे जमिनी खालील पाईप द्वारे खाली शहापूर येथील टर्बाईन वर सोडले जाईल व त्या पासून वीज निर्मिती केली जाईल. ज्यावेळी वीज निर्मिती नको असेल त्यावेळी, सदरचे पाणी पुन: त्याच टर्बाईन द्वारे वरील बाजूस जामुंडे धरणात सोडले जाईल. अशा प्रकारे विद्युत निर्मिती केली जाईल व नको असल्यावेळी पाणी पुन्हा वरती सोडले जाईल.

रविंद्र ठाकरे, अध्यक्ष यांनी जामुंडे गावात भिंत बांधली आहे का ? भिंत बांधावयाची आहे ? भिंत बांधल्यानंतर पाणी वरती कसे येणार ?

लहु जाधव, प्रकल्प प्रवर्तक यांनी सद्यास्थितीत कोणतेही बांधकाम केलेले नाही, हे सर्व प्रस्तावित आहे. पाणी साठा हा आधी शहापूर तालुक्यातील भातसा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात काळभोंडे व काठोळे या ठिकाणी धरण बांधून करण्यात येइल. सदरचे पाणी हे टर्बाईन द्वारे भुमिगत पाईपमधून जामुंडे येथील प्रस्तावित धरणात सोडले जाईल. तर वीज निर्मिती वेळी जामुंडे धरणातील पाणी नैसर्गिक प्रवाहाद्वारे जमिनी खालिल पाईप द्वारे खाली शहापूर येथील टर्बाईन वर सोडले जाईल व त्या पासून वीज निर्मिती केली जाईल. सदरचा टर्बाईन हा दुतर्फा वापरले जाईल एकदा वीजनिर्मिती साठी व एकदा पाणी वर नेण्यासाठी.

रविंद्र ठाकरे, अध्यक्ष यांनी सदर प्रकल्पात कोणत्या बाजूस वन जमीन व कोणत्या बाजूस खाजगी जमीन क्षेत्र व ते किती क्षेत्र असेल ?

लहु जाधव, प्रकल्प प्रवर्तक यांनी जामुंडे गावातील एकुण १०६ हेक्टर क्षेत्र हे प्रकल्पासाठी लागणार असून त्यापैकी, ३५.१८ हेक्टर क्षेत्र हे खाजगी आहे व ते पुर्व बाजूस आहे. तर खालील बाजूस वनक्षेत्र आहे.

तद्नंतर मा. अध्यक्षांनी सदर प्रकल्पाच्या अनुषंगाणे लोकांना काही टिका टिप्पणी, निवेदण, आक्षेप किंवा त्यांचे काही पर्यावरणाच्या अनुषंगाणे म्हणने असेल ते मांडण्यास सांगितले.

सदर सुनावणी दरम्यान खालीलप्रमाणे मुददे उपस्थित करण्यात आले.

| अ.क्रं | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी | दिलेले उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. भाऊराव सोमा आगिवले, माजी सरपंच, जांमुडे यांनी शेतकऱ्यांना काय मोबदला देणार ? जमीन गेलेल्या शेतकऱ्याच्या मुलाला कायमस्वरूपी नोकरी, धरणग्रस्त दाखला तसेच निपुत्रिकांना पेन्शन मिळावी हि विनंती | प्रकल्प प्रवर्तक यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, ज्या जमिनी घेतल्या जातील त्यांना योग्य तो मोबदला दिला जाईल, योग्य तो भाव दिला जाईल, प्रत्यक्ष बोलणी करून पार दर्षक व्यवहार व रोख रक्कम दिली जाईल व शासनास त्या बाबत कळविले जाईल. उद्योगाकडून कुशल व अकुशल बळासाठी प्रामुख्याने गावातील लोकांचा विचार केला जाईल. त्यांना योग्य ते प्रशिक्षण दिले जाईल व प्रामाणिक पणे काम करणाऱ्या लोकांना नोकरी दिली जाईल.<br><br>श्री. रविंद्र ठाकरे, जन सुनावणी अध्यक्ष यांनी असे सांगितले की, भुसंपादन प्रक्रिया ही मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून राबविली जाते. ज्या खाजगी जमिनीचे भुसंपादन होणार आहे त्याचा प्रस्ताव तलाठी/तहसिलदार त्यांच्या कडुन प्रांतकार्यालयास पाठविला जातो. सदर प्रस्ताव आल्यानंतर भुसंपादनाबाबत स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केली जाते. भुसंपादनाची जाहिरात हि तारीख मुल्यांकणासाठी निश्चित केली जाते. म्हणजे त्या तारखेच्या पासून मागिल ३ वर्षे खरेदी खतांचा विचार करून पहिले जास्त ५० खरेदी खतांचे सरासरी काढली जाते व जी किंमत येईल ती जिरायत जमिनीची किंमत पकडली जाईल जर जमीन बागायत असेल तर त्याची किंमत दुप्पट पकडली जाईल. सदर किंमतीच्या दुप्पट रक्कमाने व नुकसान भरपाई म्हणून पुन्हा त्याचे दुप्पट |

| | | |
|---|---|---|
| | | करून ती रक्कम अदा केली जाते. जर खाजगी वाटाघाटीने खरेदी लवकरात लवकर करायची असल्यास सदर रक्कमेच्या २५ टक्के अतिरीक्त बोनस असे सर्व मिळून म्हणजेच एकुण मुळ रक्कमेच्या ५ पटीने रक्कम अदा केली जाते. अशाच प्रकारे समृद्दी महामार्गाचे भुसंपादन केले गेले आहे.<br><br>जमिनीचे पैसे वेगळे दिले जातील तसेच जर जमिनीवर घर असतील तर त्याचे वेगळे पैसे नुकसान भरपाई म्हणून दिले जाते. याठिकाणी १० लोकांची घरे बाधीत होणार आहेत.<br><br>प्रकल्प हा शासणामार्फत राबवला असेल किंवा तो शासनाकडून अधिसुचित केल्यानंतर शासन निर्णयास अनुसरूण प्रकल्पबाधित लोकांना योग्य ते प्रमाणपत्र दिले जाते व शासन सेवेत गुणवत्तेनुसार निवड केली जाते. |
| २. | श्री. देवीदास सावळीराम खडके, रा. अकोले, अहमदनगर-<br><br>आम्ही या गावाचे नाही परंतू आम्ही प्रकल्पग्रस्त आहोत व आम्हास एका कुटुंबात एका माणसास शासकीय नोकरी तसेच आदर्श पुर्नवसन या मार्गाने ११५ लोकांना नोकरी व पुर्नवसन केले होते. त्याप्रमाणे या लोकांनासुद्धा सुविधा द्याव्यात. | श्री. रविंद्र ठाकरे, जन सुनावणी अध्यक्ष - याठिकाणी १० लोकांच्या घराचे पुर्नवसन करावे लागणार आहे. त्यांना त्यांच्या घराच्या किंमतीच्या २.५ पट रक्कम किंवा घर बांधून दिले जाईल. शासकिय नोकऱ्याबाबत आपण आपल्या स्तरावर शासनास पाठपुरावा करावा. कंपनी खाजगी असल्याने नोकऱ्याबाबत स्थानिकांना प्राधाण्य दिले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| ३ | श्री. श्रावण अण्णजी डोके, रा जामुंडे गाव – जामुंडे कामनवाडी येथील लोकांच्या समस्यांबाबत योग्य ती नोंद घ्यावी लोकांना रस्ता नाही, पाणी नाही, वीज नाही, शिक्षणाचा अभाव आहे. त्यामुळे पुढिल शिक्षणाची व्यवस्था करावी व गावाचा विकासाचा विचार करावा. | प्रकल्प पवर्तकाचे प्रतिनिधी यांनी कंपनीने सी.एस.आर मध्ये योग्य ती तरतुद केलेली आहे. यामध्ये रस्ता, पिण्याचे पाणी, स्वच्छता, शिक्षण इत्यादीबाबत प्रकल्प सुरु होण्यापुर्वीच उपायोजना केली जाईल. आय.टी.आय. मध्ये सिव्हिल, मेकॅनिकल, ईलेट्रीकल या शिक्षणाच्या अनुषंगाने नोकरीचा विचार केला जाईल. अकुशल कामगार म्हणून गावातील अशिक्षित लोकांना घेतले जाईल. तसेच जे कमी शिकलेले आहेत त्यांना योग्य ते प्रशिक्षण दिले जाईल. सी. एस. आर खर्च हा २ विभागात केला जाईल. प्रकल्प उभारणी करते वेळी व प्रकल्प उभारणी झाल्यानंतर संबंधीत ग्रामपंचायत यांच्या बरोबर चर्चा करून प्राधान्य व आवश्यक असलेली कामे सी. एस. आर. मधून करण्यात येतील तसेच इतर उर्वरीत कामे नंतर करण्यात येतील. |
| ४ | श्रीमती. बेबी हरीचंद्र तेलम, भावली-खुर्द- इगतपुरी तालुक्यात १७-१८ डॅम उभे राहिले आहेत. आदिवासी जमातींची जमिनी घेतल्या जातात परंतू त्याचा फायदा आम्हाला मिळत नाही, शिक्षणासाठी आश्रमशाळेत घातले जाते, ज्यांची जमीन धरणात जाते त्याघरातील जर ४ मुले शिक्षित असतील तर त्यातील फक्त १ मुलाला नोकरीवर घेण्यात येते तर बाकींना | अध्यक्ष यांनी या बाबत प्रकल्प प्रवर्तक व गावातील ग्रामपंचायत यांनी योग्य तो निर्णय घ्यावा. |

| | | |
|---|---|---|
| | नोकरीवर घेतले जात नाही तर त्यांचे काय करायचे ? | |
| ५ | श्री. गुरूनाथ वीर, रा. मानवडे-<br>आम्ही प्रकल्प प्रवर्तकास जमीन देण्यास तयार नाही, असे सांगितल्यानंतर प्रकल्पधारकांनी भुसंपादन हे जिल्हाधिकारी किंवा सरकार कडून घेतले जाईल, जमीन आमची असल्यावर सरकार आमच्या जमिनीचे भाव ठरवणारे कोण ? आम्ही मुळ मालक आहोत, योग्य तो भाव मिळाल्यास आम्ही जमीन देऊ. | अध्यक्ष तथा उपविभागीय दंडाधिकारी यांनी जमिनीचे भुसंपादन हे यापुर्वी सांगितल्याप्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून केले जाईल. भुसंपादन करतांना कुठल्याही प्रकारचा टॅक्स लागणार नाही. |
| ६ | श्री. आऊजी अगिवले जोमांग<br>विस्थापितांना गावठाण पाहिजे, लाईट पाण्याची सोय व्हावी | मा. अध्यक्ष यांनी ग्रामपंचायतीने या बाबत प्रकल्प प्रवर्तकाशी चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा. |
| ७ | श्री. भिमा मोहन वीर, रा. जामुंडे<br>आमची जमीन व घर गेले तर आम्हाला घरे बांधून द्यावी. | याठिकाणी १० घरे संपादित होणार आहेत. ज्यांना घर हवे त्यांना घर बांधून दिले जाईल व ज्यांना रोख रक्कम मोबदला हवा असेल त्यांना रोख रक्कम दिली जाईल असे मा. अध्यक्षांनी सांगितले. |
| ८ | श्री. रघुनाथ बुधा डोके,<br>गावात सध्या मंदिर आहेत ते पुन्हा बांधून देणार का ? | प्रकल्प प्रवर्तक प्रतिनिधी यांनी मंदिर संपादीत होणार असूण आम्ही आपणास मंदीर बांधून देऊ. |

| | | |
|---|---|---|
| ९ | श्री. नामदेव कडके, रा. कामाडवाडी<br><br>आम्ही जांमुणवाडी जवळ आहे, आमच्याकडे रस्ता नाही, लाईट नाही, पाणी नाही, शेत तळे आहेत त्याचा मोबदला द्यावा. | मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, शेततळे नुकसान मोबदला दिला जाईल. |
| १० | श्री. कैलास दगडु कडके रा. जामुन्डा<br><br>५ घरे जातात त्यांना गावठान मिळावा | मा. अध्यक्ष- ग्रामपंचायतीने या बाबत प्रकल्प प्रवर्तकाशी चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा. |
| ११ | श्री. अमर दुर्गुळे यांनी सदर प्रकल्प उभारतांना मोठ्या प्रमाणात गाड्यांची वाहतुक होणार आहे, मोठ्या प्रमाणात आवाज होणार आहे त्यामुळे पर्यावरणावर आघात होण्याची शक्यता आहे, गाड्यांमुळे धुळ, ब्लास्टींग मुळे आवाज, तसेच कामगार वस्ती मुळे घणकचरा, सांडपाणी निर्माण होणार आहे, वृक्षतोड होणार आहे पशुपक्षी विस्तापित होणार आहे या बाबत आपण काय उपायोजना करणार आहात याची माहिती द्यावी असे विचाले. | प्रकल्प प्रवर्तकाचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची दुरस्ती व डागडुजी केली जाईल. रस्त्यांचा सर्वे करून रस्त्यांचे पुर्णनिर्माण केले जाईल, रस्ता हा डांबरी व ज्या ठिकाणी कॉक्रीट ची गरज आहे अशा ठिकाणी कॉक्रीटीकरण केले जाईल. ब्लास्टींग हे भुमीगत केली जाईल व आवाजाची तीव्रता ही मर्यादित राखली जाईल. वन जमीन गेली आहे त्याचे पुर्नवसन केले जाईल. व नविन ठिकाणी वृक्ष लागवड केली जाईल. कामगारांना योग्य ती सुविधा पुरवली जाईल. घरगुती सांडपाण्यासाठी सांडपाणी व्यवस्था उभारली जाईल. |
| १२ | श्री. अमर दुर्गुळे आयोजक यांनी म.प्र.मंडळाकडे श्री. शशी उभाळे, तालुका अध्यक्ष, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया, यांचेकडुन निवेदन प्राप्त झाले आहे असे नमुद करून त्यामध्ये प्रकल्पामुळे नैसर्गीक | श्री. अमर दुर्गुळे यांनी असे सांगितले की, वन जमीन भुसंपादनाबाबत मा. अध्यक्षानी योग्य तो मोबदला कसा दिला जाईल या बाबत सांगितले आहे. पशुपक्षी व वनस्पती याबाबत प्रकल्पधारक प्रेझेंटेशन मध्ये माहिती दाखवलेली आहे. वन जमिनी बाबत वृक्षांची पुर्नलागवड |

| | | |
|---|---|---|
| | पाण्याचा प्रवाह परिणाम होणार आहे. जंगली पशु वनस्पती नष्ट होणार आहे, पाण्या अभावी लगतच्या जमिनीवरील पिके नष्ट होणार आहे, वन्यजिव व पशुपक्षी नष्ट होणार आहे, बागायती जमीन निसर्गरम्य जमीन नष्ट होणार, औषधी वनस्पती धोक्यात येणार, स्थानिक आदिवासी विस्तापित होणार आहेत या बाबत योग्य तो विचार करून त्यांचे पुर्नवसन योग्य पद्धतीने करावे, धरणातून निर्माण होणाऱ्या गाळाची विल्हेवाट कशी लावणार आहे, शेतीचे नुकसान होणार का ? | इतरत्र ठिकाणी करण्यात येणार आहे. आपल्या निवेदनाची नोंद घेतली आहे व त्या बाबत प्रकल्प प्रवर्तकास कळविण्यात येईल व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपायोजनाच्या बाबत उत्तर पर्यावरण विभागास कळविण्यात येईल. |
| १३ | श्रीमती. शुभांगी मोहन मनोहर रा. जामुंडे. यांनी असे नमुद केले की, प्रकल्पामध्ये पुरूषांना काम दिले जाईल त्याच प्रमाणे महिलांना काम दिले जाईल काय ?, गावाचा पाण्याच प्रश्न सोडवला पाहिजे, मुलांची शाळा ही ८ वी पर्यंत आहे व पुढील शिक्षणाची सोय नाही त्यामुळे कंपनीने जामुंडे ते इगतपुरी पर्यंत शाळेच्या मुलांसाठी बसची सुविधा करावी. मुलींना | प्रकल्प प्रवर्तकाच्या प्रतिनिधीने या बाबत ग्रामपंचायतीशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, कंपनी कडून बसची सोय करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | शिक्षण देण्याबाबत आम्ही तयार आहोत, आम्हाला गाडीची व्यवस्था करावी. | |
| १४ | श्री. भावराव बागळे, सरपंच मानवेडे, जामुंडे.<br><br>जामुंडे मानवेडे बाहुली पंप विज प्रकल्प हा आवश्यक आहे. प्रकल्प होऊ द्या परंतू आदिवासी यांना त्यांचा योग्य तो मोबदला मिळाला पाहिजे. विस्तापीतांचे योग्य ते पुर्नवसन केले पाहिजे. त्यांना लाईट पाणी नागरी सुविधा मिळायला पाहिजे, ज्यांची जमीन जाते ते भुमिहिन होत आहेत. भाऊली परिसरातील जामुंडा, गवंडा ही गावे पर्यावरण संवेदणशील क्षेत्रात (ECO SENSITIVE ZONE) येतात असे सांगितले जाते, या बाबत माहिती मिळावी.<br><br>गावाच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी, ग्रामपंचायत हद्दी मध्ये २ विहिरी आहेत, मंदिरे आहेत ते पाण्यात जाणार आहे, ते मंदिरे बांधून व विहिरी बांधून मिळाव्यात.<br><br>आधी पुर्नवसन, पाण्याची सोय व त्यानंतर प्रकल्पाची सुरवात करावी. | मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रा बाबत वन विभागा कडून माहिती घ्यावी असे सांगितले.<br><br>प्रकल्प प्रवर्तकाचे प्रतिनिधी यांनी प्रकल्प राबवतांना योग्य त्या सोयीसुविधा ग्रामपंचायतीस विश्वासात घेऊन केल्या जातील. आत्ता पेक्षा ही चांगली पिण्याच्या पाण्याची सोय, रस्ते यांची सोय केली जाईल.<br><br>कंपनीकडून आश्वासीत केले जाते की, चांगली मंदिरे बांधून दिले जाती, पिण्याच्या पाण्याची सोय केली जाईल. विहिरीचे पुर्ननिर्मान किंवा नुकसान भरपाई दिली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| १५ | श्री. मनोहर पंत वीर<br><br>आमच्या अटी मान्य कराव्यात नंतरच प्रकल्पाची सुरवात करावी. | मा. अध्यक्ष यांनी सांगितले की, गावकऱ्यांच्या ज्या काही सुचना आहेत त्या ग्रामपंचायत व प्रकल्प प्रवर्तक यांनी चर्चा करून योग्य तो निर्णय घेऊन उपायोजना कराव्यात. खाजगी लोकांना जमिनी विकू नये. |

सदर सुनावणीदरम्यान ०२ व सुनावणी पुर्वी ०१ लेखी निवेदन प्राप्त झाले.

सदर जाहीर लोक सुनावणीचे संयोजक यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात परंतु कोणीही मुददा उपस्थित केला नाही. त्यांनी पुढे नमुद केले की, सदर जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येईल.

उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांच्या संमतीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

( अमर दुर्गुळे )
**संयोजक तथा उप प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि मंडळ, नाशिक**

(लिंबाजी सु. भड)
**सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि. मंडळ, नाशिक**

(रविंद्र ठाकरे)
**अध्यक्ष तथा**
**मा. उप-विभागिय दंडाधिकारी,**
**तथा सहाय्यक जिल्हाधिकारी,**
**इगतपुरी**